पञ्‍जो विभागो - पठमो पाठो ।

# उट्ठान सुत्तं ।

पालितिपिटक साहित्यामध्ये १) सुत्तपिटक, २) विनयपिटक, ३) अभिधम्मपिटक या ग्रंथांचा समावेश होतो. सुत्तपिटकामध्ये शेवटचा निकाय खुद्दकनिकाय असून यामध्ये पंधरा ग्रंथांचा समावेश होतो. यापैकी पाचवा ग्रंथ 'सुत्तनिपात' असून त्यामधून हा पाठ घेतलेला आहे.

या पाठामध्ये उद्योगाचे सुपरिणाम व निरुद्योगाचे दुष्परिणाम वर्णिलेले असून उद्योगाच्या आश्रयाने दुःखाचा अंत कसा करावा याचे वर्णन यामध्ये प्राप्त होते. सामाजिक, सांस्कृतिक आणि नीतिमूल्य समजावून घेण्याच्या दृष्टीने 'उट्ठान सुत्तं' हा पाठ अत्यंत महत्त्वाचा आहे.



उट्ठहथ निसीदथ, को अत्थो सुपितेन वो ।
आतुरानञ्हि का निद्दा, सल्लविद्धान रूप्पतं ॥१॥

उट्ठहथ निसीदथ, दळ्हं सिक्खथ सन्तिया ।
मा वो पमत्ते विञ्ञाय,
मच्चुराजा अमोहयित्थ वसानुगे ॥२॥

याय देवा मनुस्सा च, सिता तिट्ठन्ति अत्थिका ।
तरथेतं विसत्तिकं, खणो वो मा उपच्चगा ।
खणातीता हि सोचन्ति, निरयम्हि समप्पिता ॥३॥

पमादो रजो पमादो, पमादानुपतितो रजो ।
अप्पमादेन विज्जाय, अब्बहे सल्लमत्तनो ति ॥४॥

*(संदर्भग्रंथ : सुत्तनिपातो - चूळवग्गो)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**उट्ठान** (नपुं.) - उत्थान, उभारणे
**का** (स्त्री.) - कोणती
**सल्ल** (पुं.) - तीर, बाण
**मा** - नको
**उपच्चगा** (क्रि.) - पार झाला, पुढे गेला
**रज** (पुं. नपुं.) - धुळ, धुलीकण
**को** (पुं.) - कोणता, कोण
**निद्दा** (स्त्री.) - निद्रा, झोप
**दळ्हं** (वि.) - दृढ निश्चय, ठाम
**सिता** (स्त्री.) - नांगरलेली ओळ
**निरय** (पुं.) - नरक
**अप्पमाद** (वि.) - जागरुकता

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) उद्योगी व्यक्तीने काय करावयास पाहिजे ?
(२) तृष्णेचे दुष्परिणाम वर्णन करा.
(३) 'उट्ठानसुत्तं' या पाठाचा सारांश लिहा.

**टिपणे**

- आळस, कंटाळा, झोप, गर्व, अहंकार, स्वार्थ यांमध्ये आपल्या मूल्यवान जीवनातील वेळ वाया घालू नये.
- जीवनात वेळेचा सदुपयोग करून चांगले कार्य करावे.

★★★